# १८ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला उद्यापासून सुरुवात

- बी. पी. सिंग, विक्रम गोखले, उषा खन्ना यांचा विशेष सन्मान
- 'महाराष्ट्राचे हिरक महोत्सवी वर्ष' ही यावर्षीची महोत्सवाची 'थीम'
- सांस्कृतिक मंत्री अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार 'पिफ'चे उद्घाटन

पुणे, दि. ८ जानेवारी, २०२० : 'पुणे फिल्म फाउंडेशन' आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने होणारा 'पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' अर्थात 'पिफ' उद्या गुरुवार दि. ९ जानेवारी, २०२० पासून सुरू होत आहे. गुरूवारी दुपारी ५ वाजता जंगली महाराज रस्त्यावरील बालगंधर्व रंगमंदिर या महोत्सवाचा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात अनेक हिंदी मालिकांचे दिग्दर्शक बी. पी. सिंग आणि अभिनेते विक्रम गोखले यांना 'पिफ डिस्टिंग्विश्ड अ‍ॅवॉर्ड' हा विशेष पुरस्कार प्रदान करण्यात येईल तर ज्येष्ठ संगीत दिग्दर्शिका उषा खन्ना यांना या वर्षीचा 'एस. डी. बर्मन इंटरनॅशनल अवॉर्ड फॉर क्रिएटिव्ह म्युझिक अ‍ॅण्ड साउंड' देत सन्मानित करण्यात येणार आहे. राज्याचे नवनिर्वाचित सांस्कृतिक मंत्री अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत महोत्सवाचे उद्घाटन पार पडणार आहे. याबरोबरच सीआयडी या मालिकेत भूमिका साकारलेले अभिनेते शिवाजी साटम, आदित्य श्रीवास्तव आणि दयानंद शेट्टी यांच्याबरोबर प्रसिद्ध मराठी अभिनेत्री मुक्ता बर्वे व अभिनेता सुबोध भावे यांची खास उपस्थिती असणार असल्याची माहिती महोत्सवाचे अध्यक्ष आणि संचालक डॉ. जब्बार पटेल यांनी ही माहिती दिली.

'महाराष्ट्राचे हिरक महोत्सवी वर्ष' अशी यावर्षीच्या महोत्सवाची 'थीम' असून या कार्यक्रमानंतर जुआन होजे कँपानेला दिग्दर्शित 'द विझल्स टेल' हा अर्जेंटीनाचा चित्रपट महोत्सवाची 'ओपनिंग फिल्म' म्हणून लॉ कॉलेज रस्ता व कोथरूड येथील एनएफएआयमध्ये दाखविला जाईल.